आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१२ ऑक्टोबर २०२५ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महाराष्ट्रातल्या पाच समुद्र किनाऱ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचं ब्लू फ्लॅग मानांकन प्रमाणपत्र

- तेलंगणात कामारेड्डी जिल्ह्यात बनावट चलन रॅकेट पोलिसांकडून उद्ध्वस्त, ८ जणांना अटक

- महिला एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना ऑस्ट्रेलिया बरोबर होणार

**आणि**

- ऑस्कर विजेती अभिनेत्री डायन कीटन यांचं कॅलिफोर्नियामध्ये निधन

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या पाच समुद्र किनाऱ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचं ब्लू फ्लॅग मानांकन प्रमाणपत्र मिळालं आहे. या यादीत रायगड जिल्ह्यातल्या श्रीवर्धन आणि नागावसह, पालघरमधल्या पर्णका, तसंच रत्नागिरी जिल्ह्यातल्या गुहागर आणि लाडघर या किनाऱ्यांचा समावेश आहे. महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी याबाबत माहिती जाहीर केली. जागतिक स्तरावर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक समुद्र किनाऱ्यांना डेन्मार्कच्या फाऊंडेशन फॉर एन्व्हायरन्मेंटल एज्युकेशन संस्थेकडून ३३ निकषांच्या मूल्यमापनातून हे मानांकन दिलं जातं. पर्यावरण शिक्षण, पाण्याची गुणवत्ता, सुरक्षा आणि पर्यावरण व्यवस्थापन यांसह सेवा- सुरक्षा या घटकांचा यात समावेश असतो.

**<><><><><>**

प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेअंतर्गत नागालँडमधील्या मोकोकचुंग जिल्ह्यात त्झुडिकोड इथं एकात्मिक मत्स्य उद्यान-ॲक्वा पार्कची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल दूरस्थ पद्धतीनं पायाभरणी केली. नागालँडमधलं हे पहिले मत्स्य उद्यान ठरणार असून ते मत्स्य व्यवसायाशी संबंधित विविध विकास उपक्रमांचं केंद्र असेल.

हे एकात्मिक मत्स्य उद्यान मुख्यतः मासे आणि बीज उत्पादनावर केंद्रीत असेल. हे केंद्र नागालँडमधील मत्स्य व्यवसाय क्षेत्राला गती देण्यात परिवर्तनकारी भूमिका बजावेल तसंच एक सर्वसमावेशक संसाधन केंद्र म्हणून कार्य करणार आहे. या उद्यानामुळे नव्या संधी निर्माण होतील, सुशिक्षित बेरोजगार युवकांना सक्षम बनवलं जाईल आणि मत्स्य व्यवसाय क्षेत्रात शाश्वत विकासाला चालना मिळेल, अशी आशा आहे.

<><><><><>

पश्चिम बंगालमध्ये दुर्गापूर इथल्या एका खासगी वैद्यकीय महाविद्यालयात शिकणाऱ्या ओदिशाच्या एका विद्यार्थिनीवर सामूहिक बलात्कार केल्या प्रकरणी पोलिसांनी तीन जणांना अटक केली आहे.

पीडितेच्या पालकांनी दाखल केलेल्या तक्रारीनंतर पीडितेवर ओदिशा इथल्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी पश्चिम बंगालच्या पोलीस महासंचालकांना पत्र लिहून आरोपींना तत्काळ अटक करण्याची मागणी केली होती. तसंच, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी संबंधित गुन्हेगारांवर त्वरित कारवाई करावी, असं आवाहन ओदिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण मांझी यांनी केलं आहे.

<><><><><>

तेलंगणात कामारेड्डी जिल्ह्यात पोलिसांनी बनावट चलन रॅकेट उघडकीला आणलं आहे. याप्रकरणी १२ जणांच्या आंतरराज्यीय टोळीतल्या आठ जणांना अटक केली. या आरोपींना बिहार आणि पश्चिम बंगालसह विविध राज्यांतून अटक

केली. यासाठी विशेष पथकं स्थापन केली होती. अटक केलेल्यांकडून तीन लाख रुपयांपेक्षा अधिक मूल्याचं बनावट चलन जप्त केलं.

<><><><><>

पश्चिम बंगालमधल्या मतदार यादीत नोंद असलेले शंभर वर्षांचे किंवा शंभरी पार केलेले जवळपास अर्ध्याहून अधिक मतदार हे मृत असल्याचं निवडणूक आयोगाच्या प्राथमिक तपासात समोर आलं आहे. ही संख्या किती आहे हे मतदारयाद्यांचं सखोल पुनरीक्षण झाल्यावरच स्पष्ट होईल असं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. सध्या पश्चिम बंगालमधल्या मतदार यादीत शंभरी पार केलेल्या १३ हजार मतदारांची नोंद आहे. पश्चिम बंगालमधे लवकरच सखोल पुनरीक्षण सुरू होईल, असं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे.

<><><><><>

जम्मू-काश्मीरमध्ये होणाऱ्या राज्यसभा निवडणुकांसाठी भारतीय जनता पक्षानं तीन उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली. त्यात गुलाम मोहम्मद मीर, राकेश महाजन आणि सतपाल शर्मा यांचा समावेश आहे. जम्मू काश्मीरमधे राज्यसभेच्या चार जागांसाठी येत्या २४ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे.

<><><><><>

आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना ऑस्ट्रेलिया बरोबर होणार आहे. विशाखापट्टणम इथं  भारतीय वेळेनुसार दुपारी ३ वाजता हा सामना सुरू होईल.

काल रात्री, कोलंबो इथल्या आर. प्रेमदासा स्टेडियमवर झालेल्या सामन्यात इंग्लंडने श्रीलंकेचा ८९ धावांनी पराभव करून स्पर्धेत सलग तिसरा विजय नोंदवला.

<><><><><>

भारत आणि वेस्ट इंडिज दरम्यान नवी दिल्लीत सुरू असलेल्या दुसऱ्या क्रिकेट कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी वेस्ट इंडिजवर फॉलोऑनची नामुष्की आली. कुलदीप यादव याच्या भेदक माऱ्यामुळे वेस्ट इंडिजला पहिल्या डावात फक्त २४८ धावा करता आल्या. तिसऱ्या दिवशी वेस्ट इंडिजच्या फलंदाजांनी कालच्या चार गडी बाद १४० या धावसंख्येवरून खेळायला सुरुवात केली. रविंद्र जडेजानं तीन तर जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज यांनी प्रत्येकी एक गडी बाद केले. भारतानं पहिल्या डावात कर्णधार शुभमन गिल नाबाद १२९ आणि यशस्वी जयस्वाच्या १७५ धावांच्या बळावर पाच गड्यांच्या मोबदल्यात ५१८ धावांवर डाव घोषित केला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा वेस्ट इंडिजच्या बिनबाद १५ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

एनएसजी, अर्थात राष्ट्रीय सुरक्षा रक्षकांच्या २६व्या विशेष तुकडीनं आज मुंबईत २००८मध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले मेजर संदीप उन्नीकृष्णन यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सायक्लोथॉन आयोजित केली होती. ‘एनएसजी’ च्या स्थापना दिनाची औपचारिक सुरुवात करून, गर्भाशय मुखाच्या कर्करोगाबाबत जागरूकता निर्माण करणं आणि ‘फिट इंडिया’ चळवळीला प्रोत्साहन देणं, हे या सायक्लोथॉनचं उद्दिष्ट आहे. एनएसजीच्या या उपक्रमात अडीचशेपेक्षा जास्त व्यावसायिक सायकलस्वार सहभागी झाले होते.

**<><><><><>**

ऑस्कर विजेती अभिनेत्री डायन कीटन यांचं काल कॅलिफोर्नियामध्ये निधन झालं. त्या ७९ वर्षांच्या होत्या. १९७७ सालच्या ‘ॲनी हॉल’ या चित्रपटातली ऑस्कर पुरस्कार विजेती भूमिका आणि ‘द गॉडफादर’ या चित्रपटातली त्यांची भूमिका प्रेक्षकांच्या स्मरणात राहिली. कीटन यांनी ६०पेक्षा जास्त चित्रपटांमध्ये काम केलं होतं. २०२४ मध्ये प्रदर्शित झालेला ‘समर कॅम्प’ हा त्यांचा शेवटचा

चित्रपट होता. कीटन यांनी काही चित्रपटांचं दिग्दर्शनही केलं होतं. यामध्ये १९९५ सालच्या 'अनस्ट्रंग हिरोज' या चित्रपटाची कॅन चित्रपट महोत्सवातल्या 'अन सर्टन रिगार्ड' श्रेणीमध्ये निवड झाली होती.

<><><><><>

तालिबाननं पाकिस्तानी लष्करी चौक्यांवर काल रात्री केलेल्या हल्ल्यानंतर पाकिस्तान-अफगाणिस्तान सीमेवर तीव्र संघर्ष सुरु झाला आहे. पाकिस्ताननं अफगाणिस्तानची राजधानी काबूलसह अन्य ठिकाणी केलेल्या हवाई हल्ल्यांना तालिबानी लष्करानं प्रत्युत्तर दिलं असून, बहरामपूर जिल्ह्यातल्या डुरंड रेषेजवळ अफगाण सैन्यानं केलेल्या कारवाईत १५ पाकिस्तानी सैनिक ठार झाल्याचं अफगाणिस्तानच्या सरकारी सूत्रांनी माध्यम प्रतिनिधींना सांगितलं. पाकिस्तानच्या सीमावर्ती भागात सात ठिकाणी आपण हल्ले केल्याचं तालिबाननं जाहीर केलं आहे. तर काबूल आणि पक्तिका प्रांतांमध्ये पाकिस्ताननं अलिकडेच केलेल्या हवाई हल्ल्यांना प्रत्युत्तर देत, अफगाण सैन्यानं सीमावर्ती भागातल्या हेलमंड, कंदाहार, झाबुल, पक्तिका, पक्तिया, खोस्ट, नांगरहार आणि कुनार या प्रांतातल्या पाकिस्तानी चौक्यांवर हल्ले सुरु केले आहेत.

<><><><><>

मादागास्करमध्ये राष्ट्राध्यक्ष अँड्री राजोएलिना यांच्या राजवटीला विरोध दर्शवण्यासाठी लष्कराच्या काही गटांनी राजधानी अँतानानारिव्होमध्ये निदर्शनं सुरू केली आहेत. वीज आणि पाण्याच्या टंचाईमुळे संतप्त होऊन, मादागास्कर मधल्या तरुणाईनं सरकार विरोधी आंदोलन छेडलं असून, काल त्याचा उद्रेक झाला, आणि हजारो निदर्शकांनी राजधानीमधल्या ‘मे थर्टीन स्क्वेअर’ भागात प्रवेश केला. याआंदोलनात मालागासी लष्कर मध्यस्थ म्हणून भूमिका बजावत आहे.

<><><><><>

गाझा पट्टीतला संघर्ष थांबवण्याबाबतच्या कराराला अंतिम स्वरूप देण्यासाठी

उद्या तांबड्या समुद्रातल्या एका रिसॉर्टमध्ये उच्चस्तरीय बैठक होणार असल्याचं इजिप्तच्या राष्ट्राध्यक्ष कार्यालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. इजिप्तचे अध्यक्ष अब्देल फताह अल-सिसी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या सह-अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीला संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांच्यासह वीसपेक्षा जास्त देशांचे नेते उपस्थित राहणार असल्याचं यात म्हटलं आहे. इजिप्त, कतार, तुर्कीये आणि अमेरिकेच्या मध्यस्थीने दोन्ही बाजूंमध्ये तीन दिवस झालेल्या वाटाघाटींनंतर गेल्या शुक्रवारी इस्रायल आणि हमास यांच्यातला युद्धबंदी करार लागू झाला. त्यानुसार, पहिल्या टप्प्यात इस्राएल गाझा, शहर, रफाह, खान युनूस आणि उत्तरेकडच्या भागातून आपलं सैन्य मागे घेईल. तसंच मदत कार्यासाठी पाच मार्ग खुले करेल आणि ओलीस आणि कैद्यांची सुटका करेल.

<><><><><>

कॅनडाच्या परराष्ट्र मंत्री अनिता आनंद आपल्या तीन दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी आज संध्याकाळी नवी दिल्ली इथं पोहोचतील. त्या उद्या परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांच्याशी चर्चा करतील आणि वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांची भेट घेतील. भारत आणि कॅनडा दरम्यान व्यापार बहुविधता, ऊर्जा परिवर्तन आणि सुरक्षा, यासारख्या मुद्द्यांवर धोरणात्मक सहकार्याबाबतची चौकट प्रस्थापित करण्याच्या दिशेनं वाटाघाटी सुरु आहेत. या पार्श्वभूमीवर ही भेट होत आहे. कॅनडाच्या परराष्ट्र मंत्री मुंबईलाही भेट देणार आहेत. यावेळी त्या कॅनडा आणि भारतात गुंतवणूक, रोजगार निर्मिती आणि आर्थिक संधीला प्रोत्साहन देण्यासाठी काम करणाऱ्या कॅनेडियन आणि भारतीय कंपन्यांच्या प्रतिनिधींची भेट घेतील.

//<><><><><>//